नियमीत दिवाणी दावा क्र. ८/२०२०
शिवबालक वि. दिनेश
निशाणी क्र. १२ खाली

**शपथेवर उलटतपास पुन्हा सुरु :-**

उलटतपास प्रतिवादीतर्फे विधीज्ञ श्री. ए.जी. कारेमोरे यांच्यामार्फत :-

११) माझे मौजा हिवरा बाजार येथील घर क्र. ५०७/२ या घराशिवाय दुसरे घर नाही. सन २०१३ ते २०१७ या कालावधीत या घराला दुसरा जुना नंबर नव्हता. मला घर क्र. ५०७/२ या घराचा प्लॉट नंबर माहिती नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी देवठाण्याच्या जागेवर घर बांधले होते. हे म्हणणे खरे आहे की, घर बांधलेली जागा ही माझ्या मालकीची नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, घर नं. ५०७/२ या घराचा सन २०१३ ते २०१७ या कालावधीत दुसरा जुना नंबर नव्हता, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१३ ते २०१७ या कालावधीत घर क्र. ५०७/२ या घराचा जुना क्र. ३९९ या घराची आराजी २० × २० = ४०० स्क्वेअर फूट होती. हे म्हणणे खरे नाही की, दिनेश दहरवाल हा मागील ११ वर्षांपासून त्या घरात होता. हे म्हणणे खरे आहे की, तो मरण पावल्यानंतर त्याचे वारस या घरात राहत आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी अपंग असल्यामुळे दुसऱ्याचा सपोर्ट घेऊन चालतो. हे म्हणणे खरे नाही की, मी फुलझरी येथे राहत असल्यामुळे व दिनेश दहरवाल हा हिवरा बाजार येथे राहत असल्यामुळे आमची ओळखपाळख नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घर ज्या जागेवर आहे ती जागा माझ्या नावावर नसल्यामुळे मी करारनाम्यानुसार विक्रीपत्र दिनेश दहरवाल याच्या नावे करून दिलेली नाही. साक्षीदार स्वतः सांगतो की, मी माझे घर किरायाने राहण्यास ६ महिन्यांसाठी १,०००/- रु. महिन्याप्रमाणे दिले होते. मी करारनामा करुन दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे घर किरायाने राहण्यास ६ महिन्यांसाठी १,०००/- रु. महिन्याप्रमाणे दिले होते, हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनेश दहरवाल हा माझ्याकडे जानेवारी २०१९ मध्ये माझे घर किरायाने द्या, असे म्हणण्यासाठी आला नाही व त्यानुसार मी माझे घर त्यांना १,०००/- रु. दरमहाप्रमाणे ५ ते ६ महिन्यांकरीता

दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी असे कोणतेही किरायापत्र व किरायाच्या रशिदा अभिलेखावर दाखल केलेल्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यामध्ये व दिनेश दहरवाल याच्यामध्ये किरायाचा महिना ५ तारखेपासून चालू होईल, असे ठरले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तसेच मी जून २०१९ मध्ये आमचे घर खाली करून द्या, असे म्हटले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी दिनेश दहरवाल यांनी मला वेळ वाढवून पाहिजे, असे म्हटले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, असे कोणतेही घर मी दिनेश दहरवाल याला भाड्याने दिले नसल्यामुळे जून २०१९ पासूनचे माझे थकीत भाडे रु. ६,०००/- त्यांच्याकडे नाही.  हे म्हणणे खरे नाही की, माझे फुलझरी येथे स्वतःचे मोठे घर असल्याकारणामुळे मला मौजा हिवरा बाजार येथील वादग्रस्त घराची आवश्यकता नव्हती, त्यामुळे मी दि. २९/०७/२०१४ रोजी सदरच्या घराचा विकण्याचा करारनामा दिनेश दहरवाल यांच्यासोबत केला होता. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी माझ्या घराच्या मालकीचे पेपर तयार झाल्यानंतर त्या घराचे खरेदीखत करून देऊ, असे दिनेश दहरवाल याच्यासोबत ठरले होते. हे म्हणणे खरे नाही की, परंतु माझ्या नावाच्या मालकी हक्काचे पेपर तयार नसल्यामुळे त्या मालमत्तेचे विक्रीपत्र मी दिनेश दहरवाल किंवा त्यांच्या वारसांना करून दिले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, सदरच्या घराचे मूल्यांकन वाढल्यामुळे मी ते घर जानेवारी २०१९ मध्ये दिनेश दहरवाल यांना किरायाने दिल्याचे खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मी त्याबाबतचे खोटे नोटीस प्रतिवादीला पाठविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या शपथपत्र व दाव्यात सांगितल्याप्रमाणे कोणतीही किरायाची रक्कम प्रतिवादीकडे शिल्लक नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला ती रक्कम वसूल करण्याचा प्रतिवादीविरुद्ध कोणताही हक्क नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीविरुद्ध खोटे शपथपत्र दाखल करून आज रोजी खोटी साक्ष दिली आहे.

उलटतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत, माझे समक्ष,

रामटेक. (एच.एस.सातपुते)

दिनांक : २८/०१/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, रामटेक